महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

# सन १८९० चा मुंबई अधिनियम क्रमांक ५

## मुंबई नगरपालिका सेवक अधिनियम, १८९०.

(दिनांक २ नोव्हेंबर, २००६ पर्यंत सुधारलेला)

# Bombay Act No. V of 1890

## The Bombay Municipal Servants Act, 1890.

*(As modified upto 2nd November 2006)*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर यांनी मुद्रित केले आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन, मुंबई यांनी प्रकाशित केले.

२००६

[Price : Rs. 3-00]

# मुंबई नगरपालिका सेवक अधिनियम, १८९०.

## (सन १८९० चा मुंबई ५)

## अनुक्रमणिका


उद्देशिका

| कलमे | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, प्रारंभ व व्याप्ती. | १ |
| २. | (१) अर्थ विवरण. | २ |
| | (२) अंमलात असलेले नगरपालिका अधिनियम यांजबरोबर हा अधिनियम वाचावा. | २ |
| ३. | विनिर्दिष्ट केलेल्या कर्तव्यांचा राजीनामा देण्यासंबंधी, ती सोडून जाण्यासंबंधी आणि त्यांच्या बाबतीत गैरहजर राहण्यासंबंधी शर्ती; कर्तव्यात हयगय करणे किंवा त्यांचा भंग करणे. | २ |
| ४. | राजीनामा दिल्यानंतर दोन महिन्यांची नोटीस न मागण्याचा अगर सेवेतून मुक्त करण्याचा अधिकार. | २ |
| ५. | अनुसूचीमध्ये अधिक मजकूर दाखल करण्याचा राज्य सरकारचा अधिकार. | ४ |
| ६. | सेवकास अधिनियमाच्या प्रती नाममात्र किंमतीत पुरविणे. | ४ |
| | अनुसची. | ४ |


---

# सन १८९० चा मुंबईचा अधिनियम क्रमांक ५.[१]

## [मुंबई नगरपालिका सेवक अधिनियम, १८९०]

[१५ जानेवारी, १८९१]

या अधिनियमात पुढील आदेश व अधिनियम याअन्वये अनुकूलन, रुपभेद व सुधारणा करण्यात आल्या आहेत :--

भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश.

सन १९५० चा मुंबई अधिनियम ८.

विधि अनुकूलन आदेश, १९५०

**ज्याअर्थी,** [२][बृहन्मुंबईत] व इतर जागी, नगरपालिकेच्या ज्या विवक्षित वर्गाच्या सेवकांच्या कामाचा लोकांच्या आरोग्याशी अगर सुरक्षिततेशी निकट संबंध असतो त्या सेवकासंबंधीचे, आणि अशा सेवकांची कर्तव्ये, त्यांनी काम सोडून जाणे व त्यांनी रजेवर जाणे या संबंधीचे विनियम अंमलात आणण्याबद्दल अधिक चांगली तरतूद करणे इष्ट आहे;

**त्याअर्थी,** पुढील प्रमाणे अधिनियम करण्यात आला आहे :--

संक्षिप्त नाव, प्रारंभ व व्याप्ती.

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई, नगरपालिका सेवक अधिनियम, १८९० असे म्हणावे.

(२) तो, [३][बृहन्मुंबईत] ताबडतोब अंमलात येईल.

(३) [४][[५][राज्य]सरकारास], अधिसूचना[६] प्रसिध्द करून या अधिनियमाचे सर्व अगर कोणतेही उपबंध, अशा अधिसूचनेच्या तारखेनंतर दोन महिन्यांपेक्षा आधीची नाही अशा तारखेस किंवा त्या तारखेनंतर मुंबई इलाख्यांतील कोणत्याही नगरपालिका जिल्ह्यास लागू करण्याचा अधिकार आहे. तसेच, या अधिनियमाच्या उपबंधास अनुसरून अशी कोणतीही अधिसूचना रद्द करण्याचा अगर तीत फेरफार करण्याचा [७][त्यास] अधिकार आहे.

अर्थ विवरण.

**२.** (१) विषयात अगर संदर्भात एतद्विरुध्द काही नसेल तर, या अधिनियमात वापरलेल्या सर्व शब्दांचा अर्थ, मुंबई शहर नगरपालिका अधिनियम, १८८८, यात त्यांना अनुक्रमे जो अर्थ दिलेला असेल तोच अर्थ असेल.

अंमलात असलेले नगर - पालिका अधिनियम यांज बरोबर हा अधिनियम वाचावा.

(२) या अधिनियमाचा [८][बृहन्मुंबईशी जेथवर संबंध] असेल तेथवर, तो, मुंबई शहर नगरपालिका अधिनियम, १८८८ याजबरोबर वाचावा ; आणि त्याचा मुंबई इलाख्यातील इतर कोणत्याही भागाशी, जेथवर संबंध असेल तेथवर, तो, सन १८७३ व १८८४ चे [९]मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम यांज बरोबर वाचावा.

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी, मुंबई शासन राजपत्र, १८९०, भाग-पाच, पृ.६० पहा. निवड समितीच्या अहवालासाठी वरील राजपत्राचे १८९०, पृ. १०३ पहा. आणि परिषदेमधील कामकाजासाठी वरील राजपत्राचे १८९०, पी. पी. ७७, १०० वर १२७ पहा.

[२] सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७ यांच्या कलम ९ द्वारे तसेच सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ८ याद्वारे "मुंबई शहरात" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

[३] वरील अधिनियमांद्वारे "मुंबई शहरात" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

[४] भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेश याद्वारे "गव्हर्नर इन कौन्सिल" या मजकुराऐवजी "प्रांतिक सरकारास" हा मजकूर दाखल केला.

[५] विधि अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

[६] या अधिनियमाच्या तरतुदी विवक्षित नगरपालिका जिल्ह्यांना लागू करणाऱ्या अधिसूचनेसाठी मुंबई नियम व आदेश पहा.

[७] भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेश याद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

[८] सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम ९ द्वारे तसेच सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ८ याद्वारे "मुंबई शहराशी जेथवर संबंध" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

[९] आता, हे अधिनियम निरसित केलेला मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९०१ पहा.

निर्दिष्ट केलेल्या कर्तव्यांचा राजीनामा देण्यासंबंधी, ती सोडून जाण्यासंबंधी आणि त्याच्या बाबतीत गैरहजर राहण्यासंबंधी शर्ती.

कर्तव्यात हयगय करणे किंवा त्याचा भंग करणे.

**३.** (१) अनुसूचीमध्ये निर्दिष्ट केलेल्या कर्तव्यांपैकी कोणतेही कर्तव्य करण्यासाठी महानगरपालिकेने किंवा तिच्या वतीने किंवा कोणत्याही नगरपालिकेने अगर तिच्या वतीने कामावर ठेवलेला जो कोणताही नगरपालिका अधिकारी, सेवक अगर इतर व्यक्ती,--

(क) [१][बृहन्मुंबई] कमिशनरच्या अगर या बाबतीत त्याने नेमलेल्या व्यक्तीच्या लेखी परवानगी शिवाय, व इतरत्र अशी परवानगी देण्यास नगरपालिकेने अधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या परवानगी शिवाय आजारपणाच्या किंवा अपघाताच्या अशा कारणामुळे आपल्या पदाची कर्तव्ये पार पाडण्यात असमर्थ होईल किंवा अशा कमिशनरने किंवा त्याने नेमलेल्या अशा व्यक्तीने किंवा अशा अधिकाऱ्याने जे इतर कोणतेही वाजवी कारण मान्य केले असेल त्या कारणांव्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणास्तव, कमिशनरला किंवा त्याने नेमलेल्या अशा व्यक्तीला किंवा अशा अधिकाऱ्यास निदान दोन महिन्यांची लेखी नोटीस न देता आपल्या पदाचा राजीनामा देईल. ती कर्तव्ये करण्याचे सोडून देईल किंवा ती करण्याच्या बाबतीत गैरहजर राहील ; अथवा

(ख) महानगरपालिकेने अगर तिच्यावतीने किंवा कोणत्याही नगरपालिकेने अगर तिच्यावतीने कामावर ठेवलेला अशा नगरपालिकेचा अधिकारी, सेवक अगर इतर व्यक्ती या नात्याने ज्या कोणत्याही विधीचा किंवा त्या नियमाच्या किंवा आदेशाच्या कोणत्याही उपबंधाचे पालन करणे हे त्याचे कर्तव्य असले त्या उपबंधाचा जाणूनबुजून भंग केल्याबद्दल किंवा त्याचे पालन करण्यात हयगय केल्याबद्दल दोषी असेल ; अथवा

(ग) खंड (क) किंवा खंड (ख) याखालील अपराध करण्यास प्रोत्साहन देईल ;

तो , नोकरीच्या चालू मुदतीबद्दल येणे असलेल्या त्याच्या वेतनावरील व एक महिन्याहून अधिक नाही अशा मुदतीबद्दल येणे असलेल्या वेतनाच्या थकबाकीवरील हक्कास मुकण्यास पात्र होईल ; आणि अशा रितीने हक्कास मुकण्याव्यतिरिक्त व त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधिअन्वये अगर नियमान्वये त्यास जी कोणतीही इतर शास्ती करता येईल त्या शास्तिव्यतिरिक्त तो, फौजदारी न्यायाधिशाकडून दोषी ठरविण्यात आला असता, महिन्यांपर्यंत असू शकेल कैदेच्या शिक्षेस पात्र अगर द्रव्य दंडाच्या शिक्षेस अगर या दोन्हीही शिक्षांस पात्र होईल:

परंतु , असा कोणताही अधिकारी, सेवक अगर इतर व्यक्ती, आपली कर्तव्ये पार पाडण्यास त्यावेळी अपात्र असल्याबद्दल आणि ती अपात्रता एक महिनाभर अगर अधिक मुदतीतपर्यंत राहण्याचा संभव आहे अशाबद्दल याबाबतीत मुंबई शहरात कमिशनरने आणि इतरत्र नगरपालिकेने नेमलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सहीचे प्रमाणपत्र सादर करील, तर राजीनामा देण्यास लागणारी परवानगी त्यास तात्काळ दिली पाहिजे.

तसेच, पूर्वोक्त प्रमाणपत्राबद्दल अगर त्या संबंधीच्या तपासणीबद्दल कोणत्याही व्यक्तीकडून कोणतीही फी घेता कामा नये.

(२) पोट कलम (१), खंड (क) आणि (ख) यातील उपबंध हा अधिनियम संमत झाल्याच्या तारखेस महानगरपालिकेच्या अगर इतर कोणत्याही नगरपालिकेच्या नोकरीत असलेल्या व्यक्तीस त्या तारखेपासून दोन महिन्यांची मुदत संपेपर्यंत लागू होणार नाहीत.

राजीनामा दिल्यानंतर दोन महिन्याची नोटीस न मागण्याचा अगर सेवतून मुक्त करण्याचा अधिकार.

**४.** (१) कमिशनर यांस किंवा कलम ३ (क) याअन्वये नगरपालिकेने अधिकार दिलेल्या अधिकाऱ्यास--

(क) स्वविवेकानुसार, राजीनामा त्याच्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आंत अंमलात येईल अशा रीतीने स्वीकारण्याचा अधिकार आहे ; अथवा

(ख) वर सांगितल्याप्रमाणे कामावर ठेवलेल्या कोणत्याही नगरपालिका अधिकाऱ्याने, सेवकाने अगर इतर व्यक्तीने आपला राजीनामा दिल्यानंतर कोणत्याही वेळी त्या अधिकाऱ्यास, सेवकास अगर अशा व्यक्तीस सेवेतून मुक्त करण्याचा अधिकार आहे.

---

[१] सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम ९ द्वारे तसेच सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ८ याद्वारे "मुंबई शहरात" या ऐवजी हा मजकूर दाखल केला.

(२) पोट-कलम (१) खंड (ख) अन्वये सेवेतून मुक्त केलेल्या अशा कोणत्याही अधिकाऱ्यास, सेवकास अगर इतर व्यक्तीस, तो व महानगरपालिका किंवा तिचा प्रतिनिधि यांच्यात झालेला कोणताही पूर्वीच्या लेखी करारास अनुसरुन, राजीनामा दिल्याच्या तारखेपर्यंत येणे झालेल्या पगाराशिवाय, आणखी १५ दिवसांबद्दल अगर राजीनामा दिल्यानंतर याबाबत अधिकृत केलेला अधिकारी १५ दिवसांपेक्षा जितक्या जास्त मुदतीपर्यंत त्यास कामावर ठेवील तितक्या मुदतीबद्दल वेतन मिळण्याचा हक्क आहे.

अनुसूची मध्ये अधिक मजकूर दाखल करण्यांचा [१][राज्य] सरकारचा अधिकार.

**५.** (१) [१][[२][राज्य] सरकारास,] महानगरपालिकेनें किंवा कोणत्याही नगरपालिकेने विनंती केली असता, वेळोवेळी अधिसूचना प्रसिध्द करून, लोकाच्या आरोग्याशी अगर सुरक्षिततेशी ज्या कोणत्याही विवक्षित वर्गातील कर्तव्यांचा संबंध असेल तो वर्ग, त्या अधिसूचनेत ठरवावयाच्या तारखेपासून अशी तारीख अशा अधिसूचनेच्या तारखेपासून दोन महिन्यांपेक्षा आधीची असता कामा नये-. या अधिनियमाच्या अनुसूचीत समाविष्ट केला आहे असे समजावे असे जाहीर करण्याचा अधिकार आहे व त्याने तसे करणे वैध असेल आणि त्या अधिसूचनेत याप्रमाणे नमूद केलेल्या प्रकारचे कोणतेही कर्तव्य करण्यासाठी महानगरपालिकेने अगर तिच्या वतीने किंवा कोणत्याही नगरपालिकेने अगर तिच्या वतीने कामावर ठेवलेल्या सर्व व्यक्तींना कलम ३ चे उपबंध त्या अधिसूचनेत याबाबत ठरविलेल्या तारखेपासून लागू करण्यात येतील.

(२) [१][[२][राज्य] सरकारास,] अशी अधिसूचना परत घेण्याचा अधिकार आहे ; तसेच त्यास, पूर्ववर्ती खंडाच्या आणि या अधिनियमांतील इतर उपबंधास अनुसरून, अशी अधिसूचना वेळोवेळी रद्द करण्याचा अगर तीत फेरफार करण्याचा आणि कोणत्याही अधिसूचनेचा अंमल हा अधिनियम ज्या कोणत्याही नगरपालिकेस अगर ठिकाणास लागू असेल त्या नगरपालिकेपुरता अगर ठिकाणांपुरता मर्यादित करण्याचा अधिकार आहे.

सेवकास अधिनियमाच्या प्रती नाममात्र किंमतींत पुरविणे.

**६.** अनुसूचीत निर्दिष्ट केलेल्या कर्तव्यांपैकी कोणतेही कर्तव्य पार पाडण्यासाठी महानगरपालिकेकडून अगर तिच्या वतीने किंवा कोणत्याही नगरपालिकेकडून अगर तिच्या वतीने जी कोणताही व्यक्ती कामावर लावली जाईल त्या प्रत्येक व्यक्तीस ती सेवेंत पहिल्याने प्रविष्ट होईल त्यावेळी आणि सध्या कामावर असलेल्या व्यक्तीस आता ताबडतोब [३][बृहन्मुंबई शहरांच्या] म्युनिसिपल कमिशनरकडून आणि इतर ठिकाणी नगरपालिकेच्या अध्यक्षाकडून, या अधिनियमाची आणि या अधिनियमान्वये दिलेल्या ज्या अधिसूचना, त्या व्यक्तीस अगर ती ज्या वर्गापैकी असेल त्यास लागू असतील त्याची इंग्रजी, मराठी, गुजराथी, कानडी अगर सिंधी भाषेतील एक प्रत, मोफत व त्यानंतर कोणत्याही वेळी एक आणा दिला असता मिळण्याचा हक्क आहे.

## अनुसूची

### (कलम ३ पहा)

जी कर्तव्ये करण्यासाठी महानगरपालिकेने अगर तिच्यावतीनें किंवा कोणत्याही नगरपालिकेने अगर तिच्या वतीने कामावर लावलेल्या व्यक्तीस कलम ३ याचे उपबंध लागू होतात ती कर्तव्ये, --

**वर्ग एक.** -- लोकांच्या आरोग्याशी ज्यांचा संबंध आहे अशी कर्तव्ये --

(क) रस्ते अगर जागा यांची झाडलोट करणे अगर ती साफ करणे ;

(ख) गटारे साफ करणे अगर धुणे ;

(ग) घरांतून, पायखान्यांतून, संडासांतून, मुत्र्यांतून अगर डबक्यांतून घाणीचे अगर दूषित पदार्थ काढून टाकणे अगर या काढून टाकलेल्या पदार्थांची व्यवस्था लावणे ;

(घ) जनावरांची प्रेते नेणे ;

(ङ) साधारणतः घाण न होऊ देणे.

---

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकुर दाखल केला.

[२] भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेश याद्वारे "गव्हर्नर इन कौन्सिल" या मजकुराऐवजी "प्रांतिक सरकारास" हा मजकूर दाखल केला.

[३] सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७ यांच्या कलम ९ द्वारे तसेच सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ८ याद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

**वर्ग दोन.** -- सार्वजनिक सुरक्षितेसंबंधींची कर्तव्ये --

पुढील व्यक्तींची कर्तव्ये --

(क) अग्निशामक पथकांतील व्यक्ती ;

(ख) कोणतीही नगरपालिका जलशाला, गटार, पंपिंग स्टेशन अगर अग्निशामक जलनलिका सुस्थितीत राखणे अगर त्यांचे काम करणे यांसंबंधाने ठेवलेल्या व्यक्ती,--मग त्यांची पदनाम कोणतेही असो-यांत--

(१) निरिक्षक,

(२) उप-निरिक्षक,

(३) फोरमन,

(४) यंत्रज्ञ,

(५) ड्रायव्हर,

(६) पहारेकरी,

(७) मजूर,

(८) कामगार,

यांचा समावेश होतो.

(ग) दिवे लावणारे.

--------------

एच ५७-६०८२ पु.-११-२००६

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर.